गडचिरोली. दिनांक १०/०७/२०१७

# *तंटामुक्ती उपाध्यक्षास अमानुषपणे ठार मारणाऱ्या पाच अवैध दारू विक्रेत्या आरोपींना जन्मठेप*

- ***देसाईगंज येथील एकलपूर जंगलातील खून प्रकरणात***

सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी नामे- भिमराव बारसागडे, पोहवा, पोस्टे देसाईगंज यांनी फिर्याद दिली की, दिनांक ०७/०५/२०११ रोजी एका अनोळखी इसमास, अज्ञात आरोपींनी एकलपुर जंगल परिसर, देसाईगंज येथे लाथा, बुक्क्या व दगडाने ठेचून जिवानीशी ठार केले. सदरहु रिपोर्टवरुन पोस्टे देसाईगंज येथे अप क्र. ००२८/११ कलम ३०२ भादवी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. परंतु सदर अनोळखी इसम हा समर्थ जाधव हटवार, रा. नांदेड येथील असल्याचे त्यांच्या नातेवाईकांकडून ओळख पटल्याने तसेच गुन्हयातील आरोपींनी मोटारसायकलवर जबरदस्तीने मृतकास त्याची सासुरवाडी मौजा उदापुरहून आणून जिवानीशी ठार केल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयात कलम १४३, १४५, १४७, १४८, १४९, ३६४, ३४ भादावी प्रमाणे वाढाविण्यात आली होती. तपासा दरम्यान रामभाऊ मारोती कुर्झेकार, मोहन मारोती कुर्झेकार, नरहरी जगन बावनकर, प्रभु पंढरी गिरपुंजे, केवळराम नारायण बावनकर अशा एकुण पाच आरोपींना अटक करण्यात आली व तपास पुर्ण होताच आरोपींच्या विरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली यांच्या न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्यात आले. सरकारी पक्षातर्फे सहा. सरकारी वकिल श्री. सचिन कुंभारे यांनी साक्षदारांना तपासले. मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री. सुर्यकांत शिंदे यांनी साक्षपुरवा तपासून व सहा. सरकारी वकिल श्री. सचिन कुंभारे यांचा युक्तीवाद ग्राहय धरून व आरोपींना दोषी ठरवून भादवीचे कलम ३०२ सहकलम ३४ अन्वये सर्व आरोपींना जन्मठेप तसेच कलम ३६४ सहकलम ३४ अन्वये दहा वर्ष सश्रम करावास व प्रत्येकी १०००/- रू. दंडाची शिक्षा आज दिनांक १०/०७/२०१७ रोजी सुनावली.

सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. सचिन कुंभारे यांनी काम पाहिले. तसेच सदर गुन्हयाचा तपास देसाईगंज पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलीस निरीक्षक दिपक निकम यांनी केला. पैरवी अधिकारी म्हणून श्री. जयेश खंदरकर, पोलीस उपनिरीक्षक तसेच कोर्ट मोहरर म्हणून महेश आकुलवार व अरविंद पेंदाम यांनी काम पाहिले.